जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

## प्रेसनोट दिनांक - ०१/०५/२०२३

### ०१ मे २०२३ महाराष्ट्र राज्य स्थापनेचा ६३ वा वर्धापन दिन

महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या ६३ व्या वर्धापन दिनोत्सवानिमित्त सोमवार दि.१ मे २०२३ रोजी सकाळी ०८/०० वा.**मा.ना.श्री.चंद्रकांत (दादा) पाटील, मंत्री,उच्च व तंत्र शिक्षण,वस्त्रोद्योग,संसदीय कार्य,महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री,पुणे जिल्हा** यांचे शुभहस्ते पोलीस संचलन मैदान शिवाजीनगर,पुणे येथे **ध्वजारोहण समारंभाचा** कार्यक्रम संपन्न झाला. राष्ट्रध्वज वंदन व संचलन समारंभास मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर,श्री. रितेश कुमार, मा.पोलीस सह-आयुक्त,श्री.संदीप कर्णिक, मा.अपर पोलीस आयुक्त,प्रशासन,श्री.अरविंद चावरिया, मा.अपर पोलीस आयुक्त,श्री.रामनाथ पोकळे,गुन्हे शाखा,पुणे, मा.अपर पोलीस आयुक्त,पुर्व प्रादेशिक विभाग,पुणे शहर श्री.रंजनकुमार शर्मा व पोलीस आयुक्तालयातील तसेच परिमंडळीय पोलीस उप-आयुक्त दर्जाचे अधिकारी उपस्थित होते. सदर वेळी पुणे शहर व परिसरातील इतर पोलीस अधिकारी व कर्मचारी तसेच शासकीय, प्रशासकीय अधिकारी व कर्मचारी हजर होते.

सकाळी ०८/०० वा.मंत्री महोदय यांचे आगमन व स्वागत झाले. प्रमुख पाहुणे म्हणुन **मा.डॉ.राजेश देशमुख,(भा.प्र.से),जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी,पुणे तसेच मा.श्री.सौरभ राव,(भा.प्र.से), विभागीय आयुक्त,पुणे विभाग,पुणे यांचे उपस्थितीत ध्वजारोहण करून,मा.पालकमंत्री महोदयाकडुन पोलीस दल,गृहरक्षक दल या संचलन पथकाची पाहणी केली.** त्यानंतर मा.पालकमंत्री यांचे हस्ते पुणे शहर पोलीस आयुक्तालयातील एकुण ३१ पोलीस अधिकारी व अंमलदार यांना सन २०२२ करीता प्राप्त झालेले मा.पोलीस महासंचालक सा़े. यांचे प्रशंसनीय सेवेसाठी सन्मानचिन्ह पदक देवुन गौरविण्यात आले. त्याचप्रमाणे पुणे जिल्हातील पुणे शहर, महाराष्ट्र राज्य गुन्हे अन्वेषण विभाग, एसआरपीएफ, पुणे ग्रामीण, महसुल व शिक्षण इत्यादीं विभागांना शासन पुरस्कृत मिळालेले मानचिन्हे,सन्मान चिन्हे व प्रशस्तीपत्रक प्रदान करून त्यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

त्याचप्रमाणे पुणे शहर पोलीस आयुक्तालयास प्राप्त झालेल्या नविन २४ पोलीस वाहनांचे मा.पालक मंत्री यांचे हस्ते अनावरण करण्यात आले आहे.

संचलन परेड कमांडर श्री.अनमोल मित्तल,प्रशिक्षणार्थी भापोसे, तसेच सेकंड इन कमांडर प्रमुख श्री. दशरथ हटकर,रापोनि.मुख्यालय,शिवाजीनगर,पुणे यांनी केले. तसेच पथसंचलना मध्ये एकुण १४ प्लाटुन होते. त्यामध्ये पुणे शहरकडील ०५, पुणे ग्रामीणकडील ०१, लोहमार्ग पुणे ०१, पिंपरी-चिंचवड ०१, एसआरपीएफ ग्रुप नं.१ व २ यांचेकडील ०४, कारागृहाकडील ०१ होमगार्ड ०१ असे होते. त्याचप्रमाणे पुणे शहर,पुणे लोहमार्ग व पुणे ग्रामीणकडील वाद्यवृंद इत्यादी २६ अधिकारी व ३७२ जवानांनी भाग घेतला होता. तसेच सुत्र संचालन सेवानिवृत्त सहा.फौज.एस.बी.नरके,(एसआरपीएफ),बल गट क्र.२,पुणे व पो.हवालदार श्री. निकम, पोलीस आयुक्तालय,पिंपरी-चिंचवड यांनी केले.

मा.मंत्री महोदय यांनी उपस्थित पदाधिकारी व अधिकारी तसेच सन्माननीय नागरीकांना औपचारीक अभिवादन करून ०१ मे महाराष्ट्र दिन सोहळा साजरा केला.